**निशाणी क्र. १७**

## सरकारतर्फे साक्षीदार क्र. १ (PW– १) यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो की,

नाव – योगेश भास्कर बोंबटकार

वय – २९ वर्षे, व्यवसाय – शेतमजुरी,

राहणार – पळशी सुपो, तालुका जळगाव जामोद, जिल्हा बुलढाणा

– – – – –

## सरतपास – सरकारी अभियोक्ता श्री.व्ही एम बापट यांच्यामार्फत

१. मयत वर्षा विष्णू खैरे ही माझी बहीण होती. दिनांक २४/०३/२०११ रोजी तिचा विवाह विष्णू आत्माराम खैरे यांच्याशी झाला होता. तिचे सासर नारायणपूर, तालुका नांदुरा, जिल्हा बुलढाणा हे होते. तिला तीन मुलं आहेत आणि एक मुलगी आहे. विष्णू खैरे शेती आणि शेतमजुरी करत असे.

२. दिनांक २८/०५/२०२१ रोजी ची घटना आहे. त्यादिवशी मला संध्याकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास बहिणीचे सासरे आत्माराम खैरे यांचा फोन आला होता. त्यांनी सांगितले की त्यांच्या मुलाने माझ्या बहिणीला ठार मारले. मी, बंटी सुरेश राऊत, विठ्ठल श्रीराम मांडवकर, संतोष कडूबा नप्ते, गजानन दशरथ घुले, आणि माझे बाबा असे सर्वजण नारायणपूर येथे पोहोचलो.

३. तेथे पोहोचलो तेव्हा एका कुडाच्या समोरच्या रूममध्ये माझी बहीण शिकता अवस्थेत पडली होती. तिचा पूर्ण चेहरा सुजलेला होता. डोळे सुजलेले होते. चेहऱ्यावर काळसर निळसर डाग होते. तिच्या डोळ्यातून रक्त वाहत होते. पूर्ण शरीरावर गाडीच्या आणि मुका माराचे काळसर निळसर डाग होते. तिच्या डोक्यावर मागच्या बाजूस मोठी जखम होती. तिचे केस रक्ताने पूर्ण भरलेले होते.

४. विष्णू खैरे यांच्या बाबांना काय झाले असे विचारले. त्यांनी सांगितले की दरवाजा उघडायला थोडा वेळ झाला त्यामुळे विष्णू खैरे यांनी माझ्या बहिणीला मारहाण चालू केली. ते म्हणाले की ते आवरायला गेले तेव्हा त्यांच्याही पोटात लाथ मारली आणि खाली पाडले व मारठोक चालूच ठेवली. त्यांनी सांगितले की माझ्या बहिणीचे केस धरून प्रथम तिचे डोके जमिनीवर आपटले. लोखंडी पलंगाच्या धाब्यावर तिचे डोके आपटले. त्यांनी पुढे सांगितले की गाडीनेही तिला पूर्ण अंगावर मारले.

५. त्यानंतर आम्ही पोलिस ठाण्यात गेलो आणि रिपोर्ट दिला. तिच्या पोटामध्ये पाच महिन्याचे बाळही होते. रिपोर्ट मी दिला होता. मी सांगितले आणि पोलीस ठाण्यात पोलिसांनी टाईप केले. त्यावर मी सही केली आहे. तो रिपोर्ट मी दाखविल्यास ओळखू शकतो. आता मला दाखविण्यात आलेला रिपोर्ट तोच आहे. त्यामधील मजकूर बरोबर आहे. त्यावरील सही माझी असून तो रिपोर्ट निशाणी क्रमांक १८/पी१ वर आहे.

६. त्या रिपोर्ट वरून पोलीस ठाण्यात संगणकीय प्रणाली मधून पहिली खबर तयार करण्यात आली. त्या पहिल्या खबरीवर मी सही केली. आता मला दाखवण्यात आलेली पहिली खबर तीच आहे. त्यामधील मजकूर बरोबर आहे. ती पहिली खबर निशाणी क्रमांक १९/पी२ वर आहे. पोलिसांनी माझ्याकडे विचारपूस केली होती आणि माझे बयान घेतले होते. मी विष्णू खैरे यांना ओळखतो ते आज समोरच्या स्क्रीनवर दिसत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जे. डी. तायडे यांच्यामार्फत**

७. नारायणपूर ते पळशी सुपो या दोन गावातील अंतर २५ किलोमीटर असेल. पळशी सुपो हे गाव नांदुरा ते जळगाव जामोद रस्त्यापासून सहा किलोमीटर आत मध्ये आहे. हे खरे आहे की नारायणपूर हे गाव नांदुरा ते जळगाव जामोद रस्त्यापासून ८ किलोमीटर आत मध्ये आहे. पळशी सुपो फाटा ते नारायणपूर फाटा हे अंतर सुमारे १८ किलोमीटर आहे. हे खरे नाही की नारायणपूर या गावी पळशी सुपो या गावातून कोणत्याही वाहनाने पोहोचण्यासाठी एक ते सव्वा तास लागतो. स्वतःहून सांगतो की अर्धा तास लागतो. हे खरे आहे की नारायणपूर येथून नांदुरा चे अंतर साडेनऊ ते दहा किलोमीटर आहे. हे खरे नाही की नारायणपूर ते नांदुरा पोहोचण्यासाठी सुमारे अर्धा तास लागतो. हे खरे आहे की मी आणि विष्णू खैरे नात्याने साले भाऊ आहोत.

८. हे खरे आहे की माझ्या बहिणीला आरोपी विष्णू हा माहेरी पाठवत नसल्याच्या कारणावरून आमचे वादही होत. हे खरे आहे की त्यामुळे विष्णूचे आणि आमचे पटले नाही.

प्रश्न – बहिण चांगली नांदत आहे आणि त्यामुळे आम्ही लुसलुशी इतर वाद करत नव्हतो

उत्तर – तो हमेशा वाद करत असे. त्याविषयी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी आम्ही गेलो होतो परंतु माझ्या बहिणीने तक्रार द्यायला नकार दिला.

९. हे खरे नाही की माझ्या बहिणीला त्रास नव्हता म्हणून तिने तक्रार देण्यास नकार दिला. हे खरे आहे की आरोपी आणि माझी बहीण हे दोघे मोल मजुरी करत असत. हे खरे आहे की मोल मजुरी करून त्यांचा उदरनिर्वाह व्यवस्थित व्हायचा. हे खरे नाही की माझ्या बहिणीने मोल मजुरीतून उरलेले पैसे मला उसने दिले होते. हे खरे नाही की माझ्या बहिणीने ते पैसे मला परत मागितले

होते. हे खरे नाही की त्यावरून माझे बहिणीशी अनेकदा वादही झाले होते. हे खरे नाही की त्यावरून मी माझ्या बहिणीला धमक्याची दिल्या होत्या.

१०. हे खरे आहे की बंटी सुरेश राऊत, विठ्ठल श्रीराम मांडवकर, संतोष कडूबा नप्ते 14 pt व गजानन दशरथ घुले हे माझे मित्र आहेत. आम्ही एकाच गल्लीत राहतो. हे खरे आहे की आम्ही सर्व मित्र काम पडले तर एकमेकांच्या मदतीला हजर असतो. हे खरे आहे की आम्ही एकमेकांनी सांगितले तर एकमेकांची कामे सांगितल्याप्रमाणे करतो. हे खरे नाही की घटनेच्या दिवशी त्यापैकी माझ्यासोबत कोणीही नव्हते. माहिती पडल्यानंतर आम्ही लगेचच ६:४५ वाजण्याच्या सुमारास निघालो. आम्हाला पोहोचण्यासाठी ७:४५ ची वेळ झाली. आम्ही जाण्याच्या अगोदर तेथे पोलीस आले होते. हे खरे आहे की घटनास्थळी पोहोचायला आम्हाला सुमारे आठ वाजले. तेथून पी एम साठी नांदुरा येथे गेलो. पोलीस ठाण्यात गेल्यानंतर मी तक्रार दिली. पीएम हाऊसला बॉडी कधी नेली ते मला सांगता येणार नाही. हे खरे आहे की साधारणतः नऊ सव्वा नऊ च्या सुमारास पीएम हाऊसला बॉडी नेली.

११. तक्रार देण्यासाठी गेले तेव्हा माझे बाबा आणि मित्र सोबत होते. तक्रार देण्यासाठी साधारणता साडेनऊ वाजले असतील. मी तक्रार देतेवेळी पोलिसांना सांगितले होते की माझ्या बहिणीच्या डोळ्यातून रक्त येत होते. माझ्या बहिणीच्या डोक्याच्या मागच्या बाजूस जखम झाली असे मी पोलिसांना सांगितले होते. तक्रार देताना मी पोलिसांना सांगितले होते की बहिणीच्या पोटात पाच महिन्यांचे बाळ होते.

प्रश्न – डोळ्यातून रक्त येत होते असे तुमच्या फिर्यादीमध्ये नमूद का नाही ते सांगता येईल का?

उत्तर– तेवढे माहित नाही.

१२. डोक्यात पाठीमागच्या बाजूस जखम होती त्यापैकी पाठीमागच्या हा शब्द माझ्या तोंडी रिपोर्टमध्ये का नाही ते सांगता येणार नाही. आरोपीच्या वडिलांनी जे मला सांगितले त्याप्रमाणे क्रिया दिली. हे खरे आहे की मी फक्त बहिणीचा चेहरा पाहिला होता.

प्रश्न – त्यामुळे तुम्हाला चेहरा आणि इतर ठिकाणी काळे डाग आहेत ते पाहिले नाही.

उत्तर – पी एम करतेवेळी मी बघितले होते.

१३. हे खरे आहे की पीएम करते वेळी माझ्या बहिणीच्या पोटात पाच महिन्याचे बाळ आहे हे कळाले. माझ्या तक्रारीमध्ये तिच्या पोटात पाच महिन्याचे बाळ होते हे नमूद नाही कारण तक्रार दिल्यानंतर पी एम झाले होते.

हे खरे आहे की मला मूळ घटनेबद्दल माहिती नाही आणि आरोपीच्या बाबांनी सांगितले त्या हिशोबाने मी सांगितले. हे खरे आहे की मला कोर्टात आलो तेव्हा पोलिसांनी हे प्रकरण वाचायला दिले होते. मी प्रकरण वाचले परंतु माझ्या लक्षात राहत नव्हते म्हणून पुढची तारीख घेण्यात आली. हे खरे नाही की आज आल्यानंतर पुन्हा मी हे प्रकरण वाचले. हे खरे नाही की मागील तारखेस पोलिसांनी काय आणि कसे सांगायचे ते मला सांगितले होते. हे खरे नाही की आजही मी हे प्रकरण समजावून घेतले आणि त्याप्रमाणे जबाब देत आहे. हे खरे नाही की आरोपीच्या वडिलांनाही या प्रकरणाबाबत काही माहिती नव्हती आणि त्यामुळे त्यांनी मला काही सांगितले नव्हते. हे खरे नाही की तपास अधिकाऱ्यांशी संगणमत करून मी एक प्रकरण दाखल केले आहे.

१४. हे खरे नाही की माझ्या बहिणीच्या मृत्यूमध्ये आरोपीचा हात नव्हता.

हे खरे नाही की आरोपीने माझ्या बहिणीस घटनेच्या दिवशी कधीही मारहाण केली नाही. हे खरे नाही की घटनेच्या वेळी आरोपी हा शेतात होता. हे खरे नाही की आरोपी शेतात असताना त्याला कोणीतरी पत्नीच्या बाबत कळविल्याने तो घरी आला. हे खरे नाही की तो घरी आल्यानंतर त्याला धक्का बसला. हे खरे नाही की मी खोटी साक्षी देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास – काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.02.05 17:53:51 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०५/०२/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

वाचून दाखविले, बरोबर आहे असे साक्षीदाराने सांगितले. (साक्षीपुरावा केवळ मराठी भाषेत ०१.०० वाजता सुरु करुन ०२.०५ वाजेपर्यंत नोंदविण्यात आला.)

Digitally signed by SANJAYKUMAR VIJAYKUMAR JADHAV
Date: 2025.02.05 17:53:54 +0530

मलकापूर. **(सं.वि. जाधव)**
दिनांक – ०५/०२/२०२५. अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
मलकापूर.

साक्षीपुराव्याची प्रत मिळाली.

| | |
|---|---|
| सरकारी अभियोक्तांची सही | |
| साक्षीदाराची सही/अंगठा | |
| आरोपींच्या वकीलांची सही | |